खतनिर्मिती

# गांडूळ खत कोठे आणि कसे तयार करता येईल?




**प्रा.डॉ. अशोक डंबाळे**
(मो.नं. ८३९०९७०८८३)
**डॉ. राजीव साठे**
कृषीविद्या विभाग,
कृषी महाविद्यालय, सेलू, जि. परभणी






गांडूळ खत निर्मिती हा शेतीसाठी एक पूरक व्यवसाय देखील आहे. गांडुळासाठी लागणारे खाद्य अर्धवट कुजलेले असावे. शेणखत व सेंद्रिय खत यांचे मिश्रण अर्धे-अर्धे वापरून गांडूळ खत तयार करता येते. गांडूळ खतामध्ये शेतीतील ओला पालापाचोळा, भाजीपाल्याचे अवशेष, अर्धवट कुजलेले पिकांचे अवशेष, साखर कारखान्यातील प्रेसमड यांचा वापर करता येतो.

गांडूळ खत कोणीही व कोठेही तयार करू शकतो. शेतकरी तसेच भूमिहीन मजुरांसाठी देखील हा एक जोडधंदा म्हणून उपयुक्त ठरतो. बागबगीचे, शाळा-महाविद्यालये, मोठी हॉटेल्स इत्यादी सर्वच ठिकाणी गांडूळ खताची निर्मिती करून तेथील पार्कमध्ये असलेल्या झाडांना त्याचा खत म्हणून उपयोग करता येऊ शकतो.

दिवसेंदिवस रसायनयुक्त घातक कीटकनाशकांचा तसेच खतांचा वापर वाढल्यामुळे जमिनीची उत्पादक शक्ती कमी होत चालली आहे. जमिनीतील सूक्ष्मजिवाणूंची संख्या घटत आहे. शेतजमिनीची भौतिक- रासायनिक व जैविकदृष्ट्या अपरिमित हानी होत आहे. शेतकऱ्याचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून तो कर्जबाजारी होत आहे. शेतीत सेंद्रिय खतांचा अधिकाधिक वापर करून वरील सर्व अडचणींवर मात करता येईल. गांडूळ खत हे आज उपलब्ध असलेल्या सेंद्रिय खतांपैकी एक उत्कृष्ट खत आहे. बरेचसे शेतकरी स्वतःच्या शेतामध्ये या खताचा वापर करतात व उरलेल्या खताची विक्री करतात.

गांडूळ खत निर्मिती हा शेतीसाठी एक पूरक व्यवसाय देखील आहे. गांडुळासाठी लागणारे खाद्य अर्धवट कुजलेले असावे. शेणखत व सेंद्रिय खत यांचे मिश्रण अर्धे-अर्धे वापरून गांडूळ खत तयार करता येते. गांडूळ खतामध्ये शेतीतील ओला पालापाचोळा, भाजीपाल्याचे अवशेष, अर्धवट कुजलेले पिकांचे अवशेष, साखर कारखान्यातील प्रेसमड यांचा वापर करता येतो. गांडूळ खाद्य नेहमी बारीक करून टाकावे. बायोगॅस प्लान्टमधून निघालेली स्लरीसुध्दा गांडूळ खाद्य म्हणून उपयोगात येते. खड्ड्यामध्ये गांडूळ टाकण्याअगोदर गांडूळ खाद्यावर चार-पाच दिवस सारखे पाणी मारावे, म्हणजे त्यातील उष्मा नष्ट होईल.

**शाळा व महाविद्यालये** : शाळा व महाविद्यालयांमध्ये जागा पुरेशी उपलब्ध असते. तेथील निघणारा काडीकचरा, पालापाचोळा व इतर कचरा याचे योग्य व्यवस्थापन करून त्याद्वारे गांडूळ खत निर्मिती करता येऊ शकते. असे केल्याने परिसर स्वच्छ तर राहतोच शिवाय शाळा परिसरातील झाडांना मोफत व उच्च दर्जाचे सेंद्रिय खत मिळते.

**उद्याने** : उद्यानांमध्ये विविध प्रकारची झाडे लावलेली असतात, त्यापासून भरपूर पालापाचोळा मिळतो. उद्यानांमध्ये गांडूळ खताचा वापर करून झाडांची लागवड केलेली असते. त्यासाठी संबधित उद्यानांमध्ये गांडूळ खताची निर्मिती केली जाऊ शकते.

**गृहनिर्माण संस्था** : गृहनिर्माण संस्थेत विविध प्रकारचा कचरा रोज निघत असतो व जवळपास सर्वच सोसायट्यांमध्ये लहान मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र बाग उपलब्ध असते. तेथील बागेची देखभाल करण्यासाठी संस्थेचा बराच खर्च देखील होतो. गृहनिर्माण संस्थेत गांडूळ खत सहज व अगदी कमी खर्चात निर्माण करता येतो. सदस्यांच्या घरातील तसेच घराबाहेरील कचऱ्याचा वापर गांडूळ खत निर्मितीसाठी करता येईल. त्यामुळे सोसायटीचे कचरा व्यवस्थापन हे कार्य तर होईलच शिवाय सोसायटी स्वतःच्या परिसरात निर्माण केलेले गांडूळ खत आपल्या बागेतील झाडांना देऊन उरलेल्या खताची विक्री देखील करता येऊ शकते.

**मोठमोठी हॉटेल्स** : मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल्समध्ये विशेष करून त्यांच्याकडील बागांच्या देखभालीसाठी विशेष लक्ष दिले जाते. तेथील उपलब्ध बाग व झाडांमुळे हॉटेल्स शोभून दिसतात. अशा प्रकारच्या हॉटेल्सच्या परिसरात गांडूळ खत निर्माण करून तेथील बागांसाठी खताची सोय केली जाऊ शकते.

**मोठ्या कंपन्या** : कंपन्यांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर केरकचरा निघत असल्याने तेथे सुद्धा व्हर्मी बेड वापर करून गांडूळ खताची निर्मिती करता येते. सदरील खताची विक्री करून कंपनी आर्थिक लाभ मिळवू शकते, शिवाय कंपनीमधील झाडांसाठी खतही मिळते.

**टेरेस फार्मिंग** : छतावरील फुलशेती आजकाल प्रचलित आहे. स्वतःच्या टेरेसवर उभारण्यात आलेल्या छोट्याशा शेतीला खताची गरज भासते. अशा वेळी जर आपणच आपल्या परिसरात गांडूळ खताची निर्मिती केली तर ते अधिक फायद्याचे ठरेल व आपली गरज भासल्यास उर्वरित खताची विक्रीदेखील करता येईल. तसेच त्यामधून मिळालेला पैसा टेरेस फार्मिंगमध्ये पुन्हा गुंतवता येईल.

अशाप्रकारे विविध ठिकाणी आपण गांडूळ खताची निर्मिती करून सेंद्रिय शेतीला हातभार लावू शकतो; त्याचबरोबर एक अतिरिक्त व्यवसाय म्हणून देखील त्याकडे बघू शकतो. ■